# श्री शिवाजी मराठा सोसायटीच्या विधी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना शिबीर संपन्न

श्री शिवाजी मराठा विधी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबिराचे उद्‌घाटन पिंपळाची वाडी ग्रा. खोर, ता. दौंड, जि. पुणे या ठिकाणी २७ डिसेंबर २०११ रोजी सकाळी १०.०० वाजता महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. उज्ज्वला शिंदे यांच्या हस्ते पुणे विद्यापीठाच्या ध्वजारोहणाने झाले. याप्रसंगी खोर गावचे सरपंच श्री. बाळासाहेब चौधरी, श्री. ज्ञानेश्वर चौधरी तसेच इतर सन्माननीय ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. या सात दिवसीय विशेष हिवाळी शिबिरात या विधी महाविद्यालयाचे ५० स्वयंसेवक सहभागी झाले होते.



ध्वजारोहण करताना प्राचार्या व इतर मान्यवर



शिबीराचे उद्‌घाटन करताना सर्व मान्यवर

शिबिराअंतर्गत २८ डिसेंबर २०११ रोजी डॉ. अरविंद सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली महाआरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. याचा लाभ ४५० हून अधिक रुग्णांनी घेतला. यामध्ये १७ मोतीबिंदू, ४ रक्तदाब, १६ मधुमेह, ३३ संधीवात, ४ हृदयरोग, १५ लहान मुले व १५ गरोदर माता आणि इतर दुर्धर आजारावरील रुग्णांना पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले. या सात दिवशीय शिबीरांतर्गत स्वयंसेवकांनी दररोज पथनाट्य, सांस्कृतिक कार्यक्रम, बौद्धिक खेळ इत्यादींच्या माध्यमातून जनजागृती केली. या शिबीरांतर्गत विविध प्रकल्प राबवले गेले. त्यामध्ये मोफत कायदेविषयक मार्गदर्शन, तंटामुक्ती मार्गदर्शन, अंधश्रद्धा निर्मुलन, निर्मलग्राम, व्यसनमुक्ती, मुलगी वाचवा, वृक्षारोपण व श्रमदान यावरती विशेष भर देण्यात आला. तसेच स्वयंसेवकांसाठी व ग्रामस्थांसाठी दररोज सकाळी योग अभ्यासाचे आयोजन करण्यात आले होते. श्रमदान, पथनाट्य, ग्रामसर्वेक्षण आणि रॉल्यांच्या माध्यमातून जनजागृतीचा प्रयत्न केला तसेच प्रबोधनपर व्याख्यानमाला आयोजित केली यामध्ये आरोग्य संवर्धन व युवकांच्या जीवनातील आध्यात्माचे



आरोग्य तपासणी करताना डॉ. अरविंद सूर्यवंशी



आरोग्य शिबीरातील उपक्रम



योगअभ्यास करताना स्वयंसेवक



स्वयंसेवकांनी काढलेली रॅली



पथनाट्य सादर करताना स्वयंसेवक



**ग्रामस्वच्छता उपक्रम**



**रस्ते दुरुस्ती उपक्रम**



**ग्रामसर्वेक्षण**

स्थान, भारतीय नवयुवकांपुढील आव्हाने, भारतीय शेती आणि जागतिकीकरण, ग्राहक चळवळ आणि लोक सहभाग इत्यादी विषयांवर विविध मान्यवरांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. या संपूर्ण शिबीरामध्ये ग्रामस्थांचे सहकार्य व सहभाग मोठ्याप्रमाणावर मिळाला.

या शिबीराला पुणे विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विभाग समन्वयक प्रा. नितीन मोटे यांनी भेट दिली व विविध बौद्धिक खेळावर भर देऊन स्वयंसेवकांना व नागरिकांना राष्ट्रीयसेवा योजनेचे महत्त्व पटवून दिले.



**बौद्धिक खेळ घेताना**
**प्रा. नितीन मोटे**



**स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना**
**ॲड. राहुल कुल**



**स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना**
**आमदार रमेश थोरात**

तर या कार्यक्रमासाठी वेळात वेळ काढून भिमा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन मा. श्री. ॲड. राहुल कुल, जिल्हा भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष नामदेव ताकवणे, आमदार रमेश थोरात, माजी सभापती मधुकर दोरगे व अनेक मान्यवरांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या.

| | **व्याख्याने** | **विषय** |
|---|---|---|
| मंगळवार २७-१२-२०११ | मा. डॉ. सौ. उज्ज्वला शिंदे | कायदेविषयक मार्गदर्शनाची गरज |
| बुधवार २८-१२-२०११ | मा. डॉ. अरविंद सूर्यवंशी वैद्यकीय अधिकारी | आरोग्य संवर्धन व युवक |
| गुरुवार २९-१२-२०११ | मा. शिवाजी बनकर | जीवनातील आध्यात्माचे स्थान |
| शुक्रवार ३०-१२-२०११ | मा. प्रा. नंदकुमार जाधव | भारतीय नवयुवकापुढील आव्हाने |
| शनिवार ३१-१२-२०११ | मा. रामदास पवार प्रगतशील शेतकरी | भारतीय शेती आणि जागतिकीकरण |
| रविवार १-१-२०१२ | मा. प्रा. सागर शेळके | ग्राहक चळवळ आणि लोकसहभाग |
| सोमवार २-१-२०१२ | अहवाल लेखन | विद्यार्थी मनोगत व समारोप |

**शिबिरातील प्रकल्प**

| | | |
|---|---|---|
| १. मोफत कायदेशिवक मार्गदर्शन | २. महाआरोग्य शिबीर व सर्वरोग निदान उपचार | ३. श्रमदान |
| ४. तंटामुक्ती मार्गदर्शन | ५. निर्मलग्राम | ६. व्यसनमुक्ती |
| ७. अंधश्रद्धा निर्मुलन | ८. वृक्षारोपण | |
| ९. मुलगी वाचवा | १०. पथनाट्य व सांस्कृतिक कार्यक्रम | |



**स्वयंसेवकांनी घेतलेले ग्रामस्थांचे स्नेहसंमेलन**

अशा या उत्कृष्ट कार्यक्रमाची सांगता २ जानेवारी २०१२ रोजी झाली. अत्यंत भावुक झालेल्या ग्रामस्थ व स्वयंसेवक यांचे नाते या सात दिवसांत खूपच आपुलकीचे व प्रेमाचे झाले होते. कार्यक्रमाचा समारोप समारंभ खोर ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या प्रसंगी स्वयंसेवकांनी आपली मनोगते व्यक्त केली. या वेळी स्वयंसेवकांना आपल्या भावनांवर ताबा ठेवून अश्रू आवरणे अवघड झाले होते. ग्रामस्थांना ही स्वयंसेवकांना निरोप देताना आपले अश्रू आवरता आले नाहीत. स्वयंसेवकांमध्ये व ग्रामस्थांमध्ये या सात दिवसांमध्ये एक भावनिक बंधाचे नाते निर्माण झाले होते. या प्रसंगी ग्रामस्थांनी आपली मनोगते व्यक्त करून विद्यार्थ्यांच्या कामाचे कौतुक करून पुढच्या वर्षी आमच्याच गावात कँप आणावा असे आग्रहाचे निमंत्रण दिले.



**शिबीरादरम्यान स्वयंपाक करताना स्वयंसेविका**

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. उज्ज्वला शिंदे यांच्या प्रेरणेने व महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. सागर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबीराचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. उज्ज्वला शिंदे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने ग्रामस्थांना पिंपळाची वाडी हे गाव पुढील दोन वर्ष दत्तक घेण्याचे आश्वासन दिले व सहकार्याबद्दल ग्रामस्थांचे आभार मानले, तसेच स्वयंसेवक विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून पोपट पवार यांनी काम पाहिले.